**विषय :- म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत दि. २५/०२/२०२१ रोजी झालेलया मा. शक्ती प्रदत्त समितीच्या १४ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीची १४ वी बैठक दि. २५/०२/२०२१ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे समिती कक्षामध्ये संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. नितिन करीर - मा. अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग.
२. श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास - मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग.
३. श्री. अनिल डिग्गीकर - मा. उपाध्यक्ष/म्हाडा तथा सचिव,शक्ती प्रदत्त समिती.
४. श्री. उ. प. देबडवार - सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग
५. श्री. सुनिल जाधव - मुख्य अभियंता - २ / म्हाडा
६. डॉ. योगेश म्हसे - मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ
७. श्री. श. त्र्य. जाधव - उपसचिव, नगर विकास विभाग - २ (प्रतिनिधी)
८. श्री. यशवंत बुधवंत - कक्ष अधिकारी/ वित्त विभाग (प्रतिनिधी)

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. कार्यसूचीत नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ.क. | विषय | झालेली चर्चा व समितीचे निर्णय / निर्देश |
|---|---|---|
| १. | शक्ती प्रदत्त समिती - बीडीडी चाळी पुनर्विकासाच्या तेराव्या बैठकीचा इतिवृत्तांत स्थायी करणे. | दि. १८/०९/२०२० रोजी झालेल्या समितीच्या १३ व्या बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| २. | गृहनिर्माण विभागाच्या दि. २९/१२/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये शासनाने खालील मुद्दयांबाबत अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर चर्चा करुन निर्णय घेणे.<br>i) वरळी प्रकल्पातील मोकळ्या जागेवर संक्रमण इमारती ऐवजी पुनर्वसन इमारत बांधणे,<br>ii) पुनर्वसन इमारतीतील ३ Basement पार्किंग रद्द करणे व बहुमजली | मा. उपाध्यक्ष, प्राधिकरण तथा अध्यक्ष अभ्यास गट समिती यांनी शासनाने गठीत केलेल्या समितीने मुद्दा क्र. १, २ व ३ बाबत शासनास सादर केलेला अहवालाचे मा. समिती सदस्यांसमोर सादरीकरण केले.<br>मा. मुख्य सचिव यांनी असे निर्देश दिले की, अहवालातील मुद्दा क्र. १ व २ मध्ये सुचविलेल्या बदलामुळे जर प्रकल्पाच्या बांधकाम किंमतीमध्ये बचत होत असेल तर त्यास समिती तत्वतः मान्यता देत आहे. यावर मा. उपाध्यक्ष / म्हाडा व मा. सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी असे सादर केले की, प्रकल्पामधील सुचविलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | पुनर्वसन इमारत बांधणे तसेच पार्किंगसाठी स्वतंत्र इमारत बांधणे, आणि<br>iii) बीडीडी चाळीतील अनधिकृत गाळे हस्तांतरण करण्यास असलेली प्रचलित कालमर्यादा दि. २८/०६/२०१७ ही पुढे वाढविण्यासंदर्भात | बदलांमुळे अंदाजे ५ % तफावत अपेक्षित आहे.<br><br>अभ्यास गट समितीने मुद्दा क्र. ३ - बीडीडी चाळीतील भाडेदारी हस्तांतरण बाबतची प्रचलित कालमर्यादा दि. २८/०६/२०१७ ही पुढे दि. १/१/२०२१ पर्यंत वाढविण्याबाबत तसेच बीडीडी चाळीतील भाडेकरुंची पात्रता निश्चित करण्यासाठी संचालक बीडीडी यांना सक्षम प्राधिकारी नेमणे या दोन्ही बाबी एक मताने सादर केल्या.<br><br>शक्ती प्रदत्त समितीने अभ्यास गटाच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली. |
| ३. | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत नायगांव, ना. म. जोशी मार्ग व वरळी येथील लाभार्थ्यांस मालकी हक्काने देण्यात येणारे पुनर्वसन सदनिकेचा करारनामा/ दस्त नोंदणीकृत करणेसाठी लागणारा मुद्रांक व नोंदणी शुल्क माफ करणेबाबत. अथवा नाममात्र रु. १०० प्रती सदनिका इतका कमी करणेबाबत. | मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी असे सांगितले की, याबाबतचा प्रस्ताव गृहनिर्माण विभागाने महसूल विभागाकडे सादर केला आहे. यावर महसूल विभागाने त्वरीत कार्यवाही करुन प्रस्ताव मा.मंत्री मंडळासमोर मंजूरीकरीता सादर करावे असे निर्देश मा. मुख्य सचिव यांनी दिले. |
| ४. | ना. म. जोशी मार्ग, वरळी व नायगांव येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाची सद्यस्थिती अवलोकनार्थ समितीसमोर सादर करणे. | ना. म. जोशी मार्ग, वरळी व नायगांव या तीनही बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पाची सद्यस्थिती, इत्यादी मुद्दयांबाबत म्हाडाने सदरील बैठकीत मा. सदस्यांसमोर सविस्तर सादरीकरण केले.<br><br>मा. उपाध्यक्ष / म्हाडा यांनी समितीसमोर असे सांगितले की, बीडीडी चाळीतील पोलिस सेवा निवासस्थानामधील रहिवाश्यांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्याकरीता संक्रमण गाळे उपलब्ध करुन दिले असूनही अद्यापपर्यंत पोलिस विभागाकडून चाळीतील गाळे रिक्त करुन दिलेले नाही.<br><br>यावर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी असे निर्देश दिले की, म्हाडाने संक्रमण शिबिराचे गाळे गृह विभागास हस्तांतरीत करावे व बीडीडी चाळीतील |

| | | |
|---|---|---|
| | | पोलीस विभागास दिलेल्या सेवा निवास्थानांचे गाळे म्हाडाच्या ताब्यात दयावेत. |
| ५. | आयत्या वेळचे विषय -<br>**Subject : Redevelopment of BDD chawls at Worli, Mumbai.**<br><br>The contract comprises of permanent work like Rehab Buildings, Sale buildings as well as other ancillary structures, along with onsite and offsite infrastructure works required to facilitate the same.<br><br>Since inception of the projects, the agencies have carried out below activities:<br><br>4. Completion and approval of detailed design, documentation and Engineering for permanent structures like Rehab, Sale and Commercial buildings and temporary structures like Transit Camps.<br>5. Completion of piling works for Transit Camp and other associated works.<br>6. Carrying out structural audit, geotechnical investigation, survey, utility mapping and other similar activities.<br><br>The above work have been executed in line with the project requirements. However, taking in consideration the GR dated 29th December 20, wherein changes in master plan being proposed are approved, the above activities rendered will be ineffective and separately | अभ्यास गट समितीने वरळी प्रकल्पाकरीता सुचविलेले फेरबदल मंजूर झाल्यास, कंत्राटदाराने प्रकल्पाच्या संदर्भात पूर्वी केलेल्या कामाची देयके मा. सचिव (रस्ते), सा.बां. विभाग व मुख्य अभियंता-२/ प्राधिकरण यांचेकडे सादर करावी व त्यांनी ती तपासून मान्यतेसाठी उपाध्यक्ष / प्राधिकरण यांचेकडे सादर करावीत, असे चर्चेअंती ठरले. त्यास मा. समितीने तत्वतः मान्यता दिली. |

| | | |
|---|---|---|
| | payable to the agencies apart from existing schedule of payment of Contract. | |

या चर्चेनंतर मा. अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झालयाचे जाहीर करण्यात आले.

(अनिल डिग्गीकर)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा
तथा
सदस्य सचिव - शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास.

(संजय कुमार)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा
अध्यक्ष - शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास.